संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# सभागृहे कामकाजासाठी की गोंधळासाठी

संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरु झाले आहे.पण ते कामकाजाच्यादृष्टीने किंवा सामान्य जनतेसाठी दुष्काळी ठरण्याची चिन्हे दिसतात.कारण मोदी सरकारमधील काही मंत्र्यांविरुध्द झालेले आरोपाचे भांडवल करुन कामकाज चालू द्यायचे नाही, असा प्रयत्न काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांनी चालवला आहे.आपल्या लोकशाही व्यवस्थेमध्ये संसद किंवा विधीमंडळ ही दोन्ही व्यासपिठे जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी जनतेच्या अधिकाराचे संवर्धन करुन त्याचे पालन करण्यासाठी एवढेच नव्हे तर सत्ताधारी पक्षाकडून काही चुकीच्या गोष्टी घडत असतील तर सरकारला वठणीवर आणण्यासाठी केला जावा अशी सर्वसाधारण अपेक्षा आहे.यासाठी संसदीय कामकाजाच्या नियमावलीमध्ये सभागृहात निवडून दिल्या जाणाऱ्या लोकप्रतिनिधींना विविध वैधानिक आयुधे दिली गेली आहेत. आयुधे म्हणजे सभागृहात एखादा मुद्दा किंवा प्रश्न समाधानकारक उत्तर मिळेपर्यंत धसास लावण्यासाठी वेगवेगळे नियम आणि उपनियम दिले गेले आहेत.त्यातल्या नियमांचा चाणाक्षपणे वापर करुन सत्ताधारी पक्षाला अक्षरशः जेरीस आणता येते. परंतु विरोधी पक्ष किंवा लोकप्रतिनिधी एवढे कष्ट घेण्याची तयारी करत नाहीत.त्यापेक्षा सभागृहांमध्ये गोंधळ घालून घोषणाबाजी करुन आपले प्रश्न मांडण्याचा प्रयत्न करतात.वेगवेगळ्या नियमांचा आधार घेऊन कौशल्य दाखवण्याऐवजी गोंधळाचा आधार घेतात.आणि आपण सरकारला कसे धारेवर धरत आहोत आणि जनतेसाठी कसे लढत आहोत अशा प्रकारचे भ्रामक चित्र निर्माण करतात यामध्ये सगळ्याच राजकीय पक्षांचा सारखाच सहभाग असतो. काँग्रेस सत्तेवर असताना भारतीय जनता पार्टीने अनेकवेळेला सभागृह चालू न देण्याची भूमिका घेतली होती. आता काँग्रेसकडून तोच परिपाठ पाडला जात आहे. भारताला स्वातंत्र्य मिळवून ६८ वर्षे होतील. परंतु या काळात लोकशाहीचे सार्वभौम सभागृह असलेल्या संसदेत किंवा विधीमंडळाच्या कामकाजात सुधारणा होण्याऐवजी ते दिवसेंदिवस अधिकाधिक बिघडत चाललेले दिसून येते.लोकशाहीच्यादृष्टीने ही गोष्ट अत्यंत खेदजनक म्हणावी लागेल. सरकारविरुध्दचा संताप व्यक्त करण्याचा विरोधी पक्षांना किंवा लोकप्रतिनिधींना पूर्ण अधिकार आहे. पूर्ण अधिवेशनाच्या कालावधीत एखाददुसऱ्या दिवशी सभागृहाच्या कामकाजावर परिणाम होऊ शकतो.परंतु सलग दोन दोन चार चार दिवस किंवा काहीवेळेला तर आठ आठ दिवस संसदेचे सभागृह चालू दिले जात नाही त्यावेळेला याच सभागृहाकडून लोकशाहीचा अपमान होत आहे की काय असे तीव्रपणे वाटू लागते.

### सगळेच पक्ष गोंधळी

सध्या परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज आणि राजस्थानच्या मुख्यमंत्री वसुंधरा राजे यांचे आयपीएलमधले गैरव्यवहार सम्राट ललित मोदींशी असलेल्या संबंधांवरुन वाद निर्माण झाला.या दोघींनी गैरव्यवहाराचे आरोप असलेल्या ललित मोदींना मदत केल्याचा विरोधी पक्षांचा आरोप आहे.आपल्या मंत्रीपदाचा गैरवापर केल्याने त्यांनी राजीनामा द्यावा. अशी मागणी केली जात आहे.ही मागणी एक विरोधी पक्ष म्हणून कदाचित रास्त असूही शकेल.परंतु केवळ एक दोन मंत्र्यांसाठी सभागृहाचा मूल्यवान वेळ वाया घालवायचा का यासाठी वेगळा मार्ग शोधून सरकारला यासंदर्भात स्पष्ट भूमिका घेण्याचा आग्रह धरायचा हे विरोधी पक्षांना ठरवता आले पाहिजे.अधिवेशनात अनेक महत्वाची विधेयके किंवा सामान्य जनतेशी संबंधित इतर निर्णय होणे गरजेचे असते. मंत्र्याचा राजीनामा मागण्यासाठी सगळे अधिवेशनच वेठीला धरण्याचा प्रकार अयोग्य ठरतो. यापूर्वी भारतीय जनता पार्टीने असेच प्रकार केले होते. कदाचित त्यावेळेला मंत्र्याच्या आर्थिक गैरव्यवहारांची मोठी प्रकरणे बाहेर आली होती.तरीदेखील यासंदर्भात सभागृहात चर्चा घडवून मंत्र्याला राजीनामा देणे भाग पाडणे जास्त योग्य ठरु शकते.सभागृहाचे कामकाजच होऊ द्यायचे नाही ही लोकप्रतिनिधींची कार्यपध्दत कोणत्याही प्रकारे समर्थन करता येण्यासारखी नाही.आज बदललेल्या परिस्थितीत आणि लोकशाहीच्या संवर्धनाच्यादृष्टीने विचार केला तर वर्षातून तीन वेळा भरणारी अधिवेशने अधिकाधिक सत्कारणी लावली गेली पाहिजेत. कारण या अधिवेशनाच्या प्रत्येक मिनीटासाठी काही हजार रुपये खर्च होत असतात.एका अधिवेशनासाठी काही कोटींचा खर्च होत असतो.मग त्यामध्ये लोकप्रतिनिधींना दिल्या जाणाऱ्या अधिवेशनाच्या भत्त्यापासून ते त्यांना पुरवल्या जाणाऱ्या सामुग्रीपर्यंतच्या खर्चाचा समावेश असतो. हा खर्च जर सभागृहाचे कामकाजच होऊ दिले नाही तर अक्षरशः वाया जातो. लोकांकडून गोळा केलेल्या करामधून सरकारचा कारभार चालत असतो.याचा अर्थ सरकारी पैशाची उधळपट्टी या माध्यमातून करणे कितपत योग्य आहे असा प्रश्न निर्माण होतो.

### सिध्दांतांकडे दुर्लक्ष

यातला विरोधाभास असा आहे की देशाचा कारभार नीट चालावा म्हणून या सभागृहामध्ये कायदे आणि नियम तयार केले जातात.याच सभागृहामध्ये कायदे बनवणारे लोकच सभागृहाचेच नियम पाळत नाहीत.अशा परिस्थितीत त्यांना देशासाठी किंवा सामान्य जनतेसाठी नियम किंवा कायदे करण्याचा नैतिक अधिकार तरी काय असेही वाटायला लागते.लोकशाहीत राजकारण हा सत्ताकारणाचाच भाग जरी असला तरी समाजकारण हा त्याचा प्रमुख उद्देश आहे हे विसरता कामा नये.दुर्दैवाने आज समाजकारणापेक्षा संसद आणि विधीमंडळामध्ये राजकारण जास्त खेळले जाते.सत्ताधारी पक्षाला धारेवर धरणे किंवा त्याच्या चुका दाखवून देणे हे विरोधी पक्षांचे निश्चितच कर्तव्य ठरते.विरोधी पक्ष जितका जागरुक राहील किंवा नियमांच्या माध्यमातून सरकारला जाब विचारत राहील.तेवढा तो प्रभावशाली ठरत असतो.आज या मुलभूत सिध्दांतांकडे दुर्लक्ष केले जाते.आणि केवळ आक्रमकता दाखवण्याचा हव्यास धरला जातो.यामधून जी उद्दीष्टे साध्य व्हायला हवीत ती होत नाहीत किंवा महत्वाच्या प्रश्नांची चर्चाही होत नाही.आता भारताची लोकशाही परिपक्व अवस्थेमध्ये आहे हे लक्षात घेऊन लोकप्रतिनिधींनीसुध्दा तितक्याच जबाबदारीने वागण्याची गरज आहे.सभागृहे ही गोंधळ घालण्यासाठी नसतात.सरकारला जाब विचारण्यासाठी आहेत. हे लोकप्रतिनिधींच्याच मनावर बिंबवले गेले पाहिजे. यासाठी लोकप्रतिनिधींनीच अभ्यासू होणे गरजेचे आहे. संसदीय कामकाजाचा अभ्यास करुन विविध कलम आणि नियमांच्या आधारे मंत्र्यांचे राजीनामे मागता येऊ शकतात.